**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०१ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपूर जिल्ह्यात राऊळगाव स्थित कारखान्यातल्या स्फोटात १७ जणांचा मृत्यू, तर अन्य १८ जण जखमी.**
2. **पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतीयांसाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचना जारी.**
3. **राज्यभरातील सर्व कार्यालयांचे एक महिन्यात पॉश ऑडिट करण्याचे महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे निर्देश.**

**आणि**

4. **विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताचा सामना आज वेस्टइंडिज संघाविरुद्ध ईडन गार्डन्स इथं होणार.**

**आता सविस्तर बातम्या …….**

नागपूर स्फोट

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या राऊळगाव स्थित SBL एनर्जी लिमिटेड कंपनीत झालेल्या स्फोटात 17 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर दिली आहे. या स्फोटात 18 कामगार जखमी झाले आहे. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात हा स्फोट झाल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरु असून, NDRF आणि SDRF चं पथक मदतकार्य करत असल्याचं जिल्हाधिकारी विपिन इटनकर यांनी सांगितलं.

***(होल्ड बाईट- इटनकर- २१ सेकंद)***

या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं असून, मृतांच्या वारसाला राज्यशासनातर्फे ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. मृतांची ओळख पटवण्यासाठी त्यांच्या कुटुंबीयांची DNA टेस्ट केली जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून २ लाख रुपयांची,

तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल असं त्यांनी समाज मध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

नागपूर स्फोट/वडेट्टीवार

दरम्यान, वारंवार या स्फोटाच्या घटना होत आहेत. कामगारांचा जीव वारंवार धोक्यात सापडत आहे. या कंपनीच्या सुरक्षा ऑडिट होते की नाही? यासाठी जबाबदार लोकांवर कारवाई होणार की नाही? असे प्रश्न काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी समाज माध्यमाद्वारे उपस्थित केले आहे.

पश्चिम आशिया संघर्ष

अमेरिका आणि इस्रायलनं काल केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे नेते अयातुल्ला अली खामेनी ठार झाल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषित केलं आहे. इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनं आज त्याला दुजोरा दिला. या हल्ल्यात इराणचे लष्करप्रमुख आणि संरक्षण मंत्री देखील ठार झाल्याचं वृत्त आहे. इराणमध्ये ४० दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. ऐकुया याबाबत सविस्तर वृत्तांत आमच्या प्रतिनिधींकडून -

***(व्हॉइस कास्ट - नम्रता)***

***अमेरिका आणि इस्रायलनं काल केलेल्या हवाई हल्ल्यात इराणचे ४० पेक्षा जास्त सरकारी अधिकारी मारले गेले, किमान २०१ नागरिकांचा मृत्यू झाला, तर ७०० पेक्षा जास्त नागरिक जखमी झाले. हल्ल्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी इराणनं संपूर्ण मध्यपूर्वेत हल्ले सुरु केले आहेत. दुबई, दोहा, बहरीन आणि कुवेत मध्ये अमेरिकेचे लष्करी तळ असलेल्या किंवा अमेरिकेशी संबंधित ठिकाणी इराणने हल्ले केल्याचं वृत्त आहे. संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अंतेनियो गुटेरस यांनी या हल्ल्यांचा तीव्र निषेध केला असून दोन्ही पक्षांनी ताबडतोब शस्त्र खाली ठेवून वाटाघाटी सुरु कराव्या असं आवाहन सुरक्षा परिषदेच्या तातडीनं बोलावलेल्या बैठकीत केलं. हा हल्ला मानवतेविरुद्धचा गुन्हा असून इराणमधे नरसंहार झाला आहे, असं इराणच्या प्रतिनिधींनी सांगितलं. चीनने या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली असून तात्काळ युद्ध थांबवण्याचं आवाहन केलं आहे. पश्चिम आशियात पेटलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं तिथल्या भारतीयांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. भारतीय दूतावास रात्रंदिवस मदतीसाठी उपलब्ध असतील असं त्यात म्हटलं आहे. तसंच भारतात तात्पुरत्या वास्तव्यासाठी आलेल्या परदेशी नागरिकांसाठीही परराष्ट्र मंत्रालयानं मार्गदर्शक सूचना***

***जारी केल्या आहेत. ज्या नागरिकांना व्हिसाची मुदत वाढवून हवी आहे, अथवा आपलं वास्तव्य नियमित करून हवं आहे, त्यांनी आपल्या जवळच्या परदेशी नागरिक नोंदणी कार्यालयाशी संपर्क साधावा, असं यात म्हटलं आहे. दरम्यान या युद्धाच्या तणावामुळे दुबई विमानतळावरची उड्डाणं अनिश्चित काळासाठी स्थगित केली आहेत. या विमानतळाबाहेर काही तासांपूर्वी स्फोट झाला होता. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी नम्रता फलके)***

दूध उत्पादक मेळावा

दोन हजार लिटर क्षमतेच्या बल्क मिल्क कुलरची सुविधा उपलब्ध होणे ही मेळघाटमधील परिवर्तनाची नांदी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. धारणी येथे दोन हजार लिटर क्षमतेच्या बल्क मिल्क कुलरचा उद्घाटन सोहळा आणि दूध उत्पादक शेतकरी मेळावा आज आयोजित करण्यात आला. मदर डेरी द्वारा आयोजित या दूध उत्पादकांच्या मेळाव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे संबोधित केलं.

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी - ३० सेकंद)***

मेळघाट परिसरातील दूध उत्पादन वाढवणे या प्रमुख उद्दिष्टासाठी मदर डेअरीच मार्गदर्शन महत्त्वाचं ठरणार आहे, असंही गडकरी म्हणाले.

पॉश ऑडिट

नोकरदार महिलांच्या सुरक्षिततेसाठी असणाऱ्या कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ प्रतिबंध कायदा म्हणजेच पॉश ॲक्टची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यभरातील सर्व शासकीय, खाजगी कार्यालयातील अंतर्गत तक्रार समितीचे परीक्षण अर्थात पॉश ऑडिट एक महिन्यात करण्यात यावे असे निर्देश राज्यातील सर्व जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्तांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले आहेत. रूपाली चाकणकर यांच्याकडे येणाऱ्या विविध तक्रारी, अहवाल तसेच राज्यभरात दौरा करताना याबाबत अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत. अनेक कार्यालयांमध्ये अंतर्गत समितीची स्थापना नाही, केवळ कागदावर असलेल्या समिती, त्याबाबत जाणीव जागृती नसणे, समितीला कामकाजाचे प्रशिक्षण नसणे, वार्षिक अहवाल सादर न होणे, दर्शनी भागात फलक नसणे अशा अनेक बाबी निदर्शनास आल्या आहे. या पार्श्वभूमीवर, या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत अंतर्गत समिती परीक्षण करण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहेत.

स्वच्छता मोहीम

महाराष्ट्रभूषण डॉ. श्री.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. आज सकाळी ८ ते १० या वेळेत ही मोहीम पार पडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियान या संकल्पनेला पाठबळ देण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या मोहिमेत नागपूर शहरातील पाच प्रमुख ठिकाणी स्वच्छता करण्यात आली. आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स येथील उपसंचालक (अभियांत्रिकी) कार्यालय परिसर, सीताबर्डी येथील मातृसेवा संघ परिसर, रघुजी नगर येथील राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालय परिसर, इमामवाडा बस आगार परिसर तसेच वेळा (हरीश्चंद्र) आणि खापरी गट ग्रामपंचायत अंतर्गत शंकरपूर रस्ता या भागांचा यात  समावेश होता. या दोन तासांच्या अभियानात २७ हजार ८२५ चौरस मीटर परिसर आणि  दीड किलोमीटर शंकरपूर रोड स्वच्छ करण्यात आला. एकूण ६ हजार ५८६ किलो कचरा संकलित करून तो डम्पिंग यार्डमध्ये पाठविण्यात आला.  आकाशवाणी नागपूर मध्ये देखील आज सकाळी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान आणि आकाशवाणी नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियानाचं  आयोजन करण्यात आलं. यावेळी अधिकाऱ्यांनी आणि प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी श्रमदान करून स्वच्छता केली.

वर्धा पीक पंचनामे

वर्धा जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी  पावसामुळे बऱ्याच ठिकाणी शेत पिकांचं नुकसान झालं आहे. तुर, चना आणि गव्हाच्या पिकावर संकट ओढवलं आहे. विशेषतः समुद्रपूर आणि हिंगणघाट परिसरात झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. त्यामुळे कृषी विभागाकडून संपूर्ण जिल्ह्यातील  पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करून शासनाकडून मदत मिळवून द्यावी असे निर्देश खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे केलं आहे.

क्रिकेट

विश्वचषकाच्या सुपर एट सामन्यात भारताचा सामना आज वेस्टइंडिज संघाविरुद्ध कोलकात्यातील ईडन गार्डन्स इथं होणार आहे. उपांत्य फेरीत स्थान मिळवण्यासाठी भारताला हा सामना जिंकणं अत्यावश्यक आहे. सायंकाळी सात वाजता सामना सुरु होईल. वेस्ट इंडिज सध्या गुणतालिकेत सरस धावगतीच्या जोरावर दुसऱ्या स्थानावर आहे.

हिंद दि चादर

राज्यातल्या शालेय अभ्यासक्रमात शीख गुरु तेग बहादुर यांच्या बलिदानावर आधारित धडा समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. नवी मुंबईत खारघर इथं शीख गुरु, गुरू तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीद दिनानिमित्त आयोजित हिंद दि चादर कार्यक्रमात ते बोलत होते. गुरु तेग बहादुर यांच्यासारख्या बलिदानाचं उदाहरण जगात कुठेही सापडणार नाही, त्यामुळे हा निर्णय घेतल्याचं ते म्हणाले.

******